॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME
Fax : (02462) 215572
Phone: (02462) 215246
NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT
website: srtmun.ac.in
E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२४–२५/२१५ दिनांक १०/१०/२०२४

अत्यंत तातडीचे व कालमर्यादित परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मधील अनुदान PFMS प्रणालीद्वारे EPPA जनरेट करून रक्कम उचलण्या बाबत.**

**संदर्भ:** मा. निलेश पाठक, राज्यसंपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो. मंत्रालय कक्ष,मुंबई यांचे जा.क्र. रासेयो–२०२४/प्र.क्र.७३/रासेयो कक्ष दि.०८ ऑक्टोबर २०२४

महोदय,

उपरोक्त विषयी मा. निलेश पाठक, राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो. मंत्रालय कक्ष, मुंबई यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार, आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मधील अनुदान शासनाकडून कमी प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे नियमित कार्यक्रमाची चार जिल्हयातील महाविद्यालयाची रक्कम व विशेष शिबीराची नांदेड जिल्हयातील महाविद्यालयांची पूर्ण रक्कम, लातूर जिल्हयातील काही महाविद्यालयांची रक्कम दिनांक ०१/१०/२०२४ रोजी PFMS प्रणालीद्वारे आपल्या ZBSA खात्यावर वर्ग करण्यात आलेली आहे. तरी ज्या महाविद्यालयांचा निधी उपलब्ध झालेला आहे अशा महाविद्यालयांनी आपली रक्कम दिनांक १४/१०/२०२४ पर्यंत EPPA जनरेट करून उचलण्यात यावी अन्यथा न उचललेली रक्कम आपल्या खात्यातून शासन काढून घेणार आहे असे कळविण्यात आलेले आहे. तसेच विशेष शिबीराचे लातूर, परभणी व हिंगोली या जिल्हयातील महाविद्यालयांचे देय असलेले अनुदान शासना कडून उपलब्ध झाल्यास त्वरीत वितरीत करण्यात येईल.

तरी ज्या महाविद्यालयांचा निधी उपलब्ध झालेला आहे अशा महाविद्यालयांनी आपली रक्कम दिनांक १४/१०/२०२४ पर्यंत EPPA जनरेट करून उचलण्यात यावी अन्यथा सन २०२३–२४ या वर्षाचे अनुदान आपल्या महाविद्यालयने दिनांक १४/१०/२०२४ पर्यंत PFMS प्रणालीद्वारे न उचलल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित महाविद्यालयाची असेल याची गांभीर्याने नोंद घ्यावी. तसेच अनुदान उचलण्यास काही अडचण असल्यास विद्यापीठातील श्री शाम डाकोरे, अधिक्षक लेखा मो. नंबर ९८९०६१६१५२ व श्री सुनिल ढाले, सहा. अधिक्षक लेखा मो. नंबर ९४२१०८४४९३ या क्रमांकावर संपर्क साधण्यात यावा, ही विनंती. (सोबत संदर्भिय पत्राची छायांकित प्रत जोडली आहे)

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

महाराष्ट्र शासन

क्रमांक : रासेयो-२०२४/प्र.क्र.७३/रासेयो
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष,
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर,
३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई-१.
Email: nssmantralaya@gmail.com
दिनांक :- ८ ऑक्टोबर, २०२४.

मंत्रालयीन सेवा

प्रति,

कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,

राष्ट्रीय सेवा योजना,

१. हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट विद्यापीठ, मुंबई.
२. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
४. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
५. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
६. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
७. डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी

विषय :- Central Nodal Account [CNA] अंतर्गत सन २०२३-२४ चे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या विद्यापीठे/महाविद्यालयांना सन २०२३-२४ करीता झालेल्या खर्चासाठी PFMS प्रणालीमधून वितरीत करण्यात आलेला निधी अद्याप प्रलंबित असलेबाबत ..

संदर्भ :-या कार्यालयाचे निधी वितरण पत्र दि. १०.०७.२०२४, २२.०७.२०२४, ३१.०७.२०२४ आणि १६.०८.२०२४

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये सन २०२३-२४ चे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या विद्यापीठ /महाविद्यालय यांना त्यांच्या विद्यार्थी संखेच्या प्रमाणामध्ये आधीच (सन २०२३-२४ मध्ये) झालेल्या खर्चासाठी सदर निधी सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार वितरीत करण्यात आलेला आहे.

परंतु, असे निदर्शनास आले आहे कि, अनुदान वितरीत करून बराच कालावधी होऊन सुद्धा अद्यापर्यंत आपणाकडून पूर्ण रक्कम महाविद्यालयांना वाटप करण्यात आलेली नाही तसेच, विद्यापीठांकडे/ महाविद्यालयांकडे अनुदान खर्ची करण्यात आलेले नाही. सदर बाब अत्यंत गंभीर आहे.

वितरीत करण्यात आलेला निधी पूर्ण खर्ची केल्याशिवाय केंद्र शासनाकडून सन २०२४-२५ करीताचा निधी या कार्यासनास उपलब्ध होणार नाही. सबब, आपणांस सूचित करण्यात येते की, खर्च न केलेली शिल्लक लवकरात लवकर दि.१४ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत वापरावी अन्यथा न खर्च केलेली शिल्लक आपल्या CNA खात्यातून काढून घेण्यात येईल. सदर विलंबामुळे आपले विद्यापीठ/+२ संचालनालयास सन २०२३-२४ या वर्षाकरीता निधी PFMS प्रणालीद्वारे प्राप्त न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपले विद्यापीठाची राहील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. निलेश मोहन पाठक)
राज्य संपर्क अधिकारी/वि.का.अ.
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन